महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर – ४१६ ००४

---

परिपत्रक क्र. कोविमं/शाखा माध्यमिक परीक्षा/२०८७ /दिनांक : १५.१०.२०१९

**विषय : मार्च २०२० मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करावयाच्या तारखाबाबत.. ..**

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा प्रमुखांना या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, **मार्च २०२०** मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेच्या नियमित, पुनर्परीक्षार्थी, नांव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणी सुधार योजने अंतर्गत व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने **www.mahahsscboard.maharashtra.gov.in** किंवा **www.mahasscboard.in** या संकेस्थळावर भरावयाची असून त्यांच्या तारखा व तपशिल खालीलप्रमाणे:-

| शुल्क प्रकार | माध्यमिक शाळांनी नियमित विद्यार्थ्यांची पध्दतीने आवेदनपत्रे Saral Database वरून ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखा. | माध्यमिक शाळांनी पुनर्परीक्षार्थी, यापूर्वी नांव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणी सुधार योजने अंतर्गत व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रेप्रचलित पध्दतीप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखा. | माध्यमिक शाळांनी चलन **download** करून बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा. | **वितरण केंद्राकडे** माध्यमिक शाळांनी बँकेत शुल्क भरलेल्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व **Pre-List** जमा करावयाच्या तारखा |
|---|---|---|---|---|
| (अ) नियमित शुल्कासह | मंगळवार दि. १५/१०/२०१९ ते मंगळवार दि. ०५/११/२०१९ | बुधवार दि. ०६/११/२०१९ ते शुक्रवार दि. १५/११/२०१९ | बुधवार दि. १६/१०/ २०१९ ते शनिवार दि. ३०/११/२०१९ | **सोमवार दिनांक ०२/१२/२०१९** |
| (ब) विलंब शुल्कासह | शनिवार दि. १६/११/ २०१९ ते सोमवार दि. २५/११/२०१९ (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) | | | |

अ) माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व Pre-List जमा करावयाच्या तारीख बुधवार दिनांक ०४/१२/२०१९ अशी आहे.

ब) आवेदनपत्र भरावयाच्या कालावधीमध्ये माध्यमिक शाळांनी Pre-List प्रिंट करून विद्यार्थ्यांमार्फत आवेदनपत्रातील सर्व माहिती अचूक असल्याची खात्री करावी व विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. त्यानंतर सदर Pre-List चलनासोबत विभागीय मंडळात जमा करावी.

इ.१० वी परीक्षेची आवदेनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदपनपत्रे त्यांच्या माध्यमिक शाळांमार्फत भरावी. सर्व माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापक यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील महत्वाच्या बाबी विचारात घेण आवश्यक आहे.

१.शासन निर्णय क्रमाक ई.गव्ह १५१७/प्र.क्र.१९/संगणक दिनांक १४/०८/२०१७ नुसार माध्यमिक शाळांनी नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे स्विकारण्यासाठी **Saral Database** मध्ये विद्यार्थ्यांची नोंद आवश्यक आहे. व सदर **Saral Data** वरुनच निरमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरावयाची आहेत.

२. पुनर्परीक्षार्थी, यापूर्वी नांव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणी सुधार योजने अंतर्गत व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती Saral Data मध्ये नसल्याने सदर विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीने ऑनलाईनच भरावयची आहेत. त्याच्या तारखा वरीलप्रमाणे (कॉलम नं ०३ नुसार) निश्चित करण्यात आल्या आहेत.

(कृ.मा.प.)

३. शासन निर्ण य क्र. संकिर्ण २०१९/प्र.क्र.४७/एस.डी.- ५ दिनांक ०१/०८/२०१९ नुसार दुष्काळ टंचाईग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या इ.१० वी व इ.१२ वी च्या परीक्षा फी ची प्रतिपूर्ती /माफी करण्यासाठी आवेदनपत्रामधून विद्यार्थ्याचे महसूल मंडळ,गाव, तालुका व जिल्ह्याची तसेच विद्यार्थ्याचे / पालकाचे बँक खात्याची माहिती मंडळाने जमा करणेबाबत शासनाने आदेश दिलेले आहेत. सबब त्याअनुषंगाने इ.१० वी च्या आवेदनपत्रांमधील मुद्दा क्र.२० नुसार विद्यार्थ्यांची माहिती सर्व माध्यमिक शाळांकडून भरुन घेण्यात यावी.

४. कौशल्य सेतू अभियानाचे **transfer of credit** मागणाऱ्या विद्यार्थ्यांनी देखील **online** पध्दतीने आवेदनपत्र भरुन विषयासमोर **transfer of credit** ची नोद करावी. याशिवाय संबधित विद्यार्थ्यांनी प्रचलित पध्दतीने आवेदनपत्र व आवश्यक कागदपत्रे यांची **hard copy** विभागीय मंडळात जमा करणे.

५. कोल्हापूर विभागीय मंडळातील माध्यमिक शाळांनी प्रचलित शुल्क बॅक ऑफ इंडीयाच्या **virtual account** द्वारे मंडळाच्या खात्यामध्ये जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीत विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.

६. नियमित शुल्कासह तसेच विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्याचे शुल्क दोन स्वतंत्र चलनाद्वारेच भरण्यात यावे.

७. आवेदनपत्रासोबत नियमित/विलंब शुल्क भरल्याशिवाय त्यावरील पुढील प्रक्रिया पूर्ण होणार नाही याची सर्व माध्यमिक शाळाप्रमखांनी नोंद घ्यावी.

८. आवेदनपत्रे नियमित शुल्काने भरावयाच्या तारखांमध्ये कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

## ** वितरण केंद्र प्रमुखांना महत्वाची सूचना **

**वितरण केंद्र प्रतिनिर्धीनी त्यांच्याकडे माध्यमिक शाळांनी नियमित व विलंब शुल्कान्वये बँकेत शुल्क भरेलल्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व Pre-List**
**<u>बुधवार</u> <u>दिनांक ०४/१२/२०१९</u> रोजी मंडळ कार्यालयाकडे जमा करावीत.**

15/10

विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

प्रति,
१)सर्व मुख्याध्यापक, मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा,
जिल्हा- सातारा, सांगली व कोल्हापूर.
२) शिक्षणाधिकारी (माध्य.)
सातारा, सांगली व कोल्हापूर.